

'श्वास' चित्रपटातील बालकलाकार अश्विन चितळे आणि डोळ्यांच्या कर्करोगावर मात केलेला ओंकार भालेकर यांचा कौतुक सोहळा शनिवारी पुण्यात झाला. या वेळी अश्विनच्या हस्ते ओंकारला खेळणी भेट देण्यात आली आणि दोघांची छानपैकी गट्टी जमली.

(बातमी पान ९ पाहा)

सकाळ

# एका 'श्वासा'ने गुंफले दोघा निरागसांना

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ४ : 'नूमवि'मध्ये आज एक अपूर्व योग आला. राष्ट्रीय पुरस्कार मिळवून मराठी चित्रपटसृष्टीत नवे चैतन्य आणणारा 'श्वास'मधील 'परश्या' ऊर्फ अश्विन चितळे आणि डोळ्याच्या. कर्करोगाच्या आजारावर मात केलेला ओंकार भालेकर यांची आगळीवेगळी भेट झाली. दोघेही मस्त खेळले, रमले आणि त्यांची लोभस गट्टी पाहून सर्व जण हरखून गेले.

या दोघांची भेट घडवून आणली अखिल महाराष्ट्रीय ब्राह्मण युवक महासंघाने. निमित्त होते 'श्वास'चा बालकलाकार अश्विन चितळे याच्या कौतुक सोहळ्याचे. 'श्वास' चित्रपटातील कथानकाला समांतर ठरेल, असे वास्तव जगणारा चार वर्षांचा ओंकार भालेकर याची कहाणी नुकतीच 'सकाळ'ने प्रकाशात आणली. या पार्श्वभूमीवर, ओंकार व त्याची आई संगीताताई यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या प्रसंगी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळसकर, अभिनेता सुबोध भावे, शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष रवींद्र माळवदकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अश्विनचे कौतुक करण्यात आले व 'श्वास'ला 'ऑस्कर'मध्येही घवघवीत यश मिळावे म्हणून शुभेच्छा देण्यात आल्या. त्यानंतर, अश्विनच्या हस्ते ओंकारला बॅट-बॉल, स्टडी टेबल, तसेच अनेक खेळणी देण्यात आली.

या प्रसंगी बोलताना डॉ. कोळसकर म्हणाले, ''मुलांनी बालपणाचा आनंद घेताना आलेल्या प्रत्येक संधीचा फायदा घ्यायला शिकले पाहिजे व न घाबरता आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करायला पाहिजे. या कामी पालकांची भूमिका निर्णायक असते.''

प्रतिकूल परिस्थितीत डोळ्यांच्या कर्करोगाला धैर्याने सामोरा जाणारा ओंकार व त्याच्या कुटुंबाला समाजातील विविध स्तरांतून उत्स्फूर्तपणे मदतीचा हात मिळत आहे. आजच्या कार्यक्रमातही 'शिवसंग्राम', साखळीपीर तालीम, जनजागृती नागरी कृती समिती आदी संघटनांसह अनेकांनी त्याला व्यक्तिशः आर्थिक मदत देऊ केली.